# लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स संत ज्ञानेश्वर स्टील्स प्रायव्हेट लिमिटेड, गट नं.१०७६/७७, गोळेगाव रोड, मरकळ गांव, तालुका-खेड, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत मेटालार्जिकल प्रकल्पातील इंगोट्स आणि किंवा बिलेट उत्पादन क्षमता विस्तारिकरण ३६,०००.० टन/वर्ष पासून १,५६,०००.० टन/वर्ष करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स संत ज्ञानेश्वर स्टील्स प्रायव्हेट लिमिटेड, गट नं.१०७६/७७, गोळेगाव रोड, मरकळ गांव, तालुका-खेड, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत मेटालार्जिकल प्रकल्पातील इंगोट्स आणि किंवा बिलेट उत्पादन क्षमता विस्तारिकरण ३६,०००.० टन/वर्ष पासून १,५६,०००.० टन/वर्ष करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई - ०७ /२०२० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी - २८१, दिनांक २८-०१-२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली:-

१) अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी , पुणे - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) - **सदस्य,**

३) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे - **समन्वयक**

श्री नितीन शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदस्य, समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री शिंदे यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स संत ज्ञानेश्वर स्टील्स प्रायव्हेट लिमिटेड, गट नं.१०७६/७७, गोळेगाव रोड, मरकळ गांव, तालुका- खेड, जिल्हा - पुणे, महाराष्ट्र यांच्या कार्यरत मेटालार्जिकल प्रकल्पातील इंगोट्स आणि किंवा बिलेट उत्पादन क्षमता विस्तारिकरण ३६,०००.० टन/वर्ष पासून १,५६,०००.० टन/वर्ष करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समितीची म्हणजे SEIAA – State Environment Impact Assessment Authority/ राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे. सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये **संवर्ग ब ३ (अ)** मोडत आहे.

त्याअनुषंगाने प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील राज्य तज्ज्ञ मुल्यांकन समिती-१ (State Expert Appraisal Committee-I) हीस पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यासाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला व त्यास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील राज्य तज्ज्ञ मुल्यांकन समितीस - १ ने १६८ व्या बैठकीत दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ रोजी प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान केली.

सदस्य, समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक व राष्ट्रीय वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, मप्रनि मंडळ, पुणे यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १०-०१-२०२० रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम-मध्य विभाग कार्यालय, न्यू सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-पुणे, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पुणे, जिल्हा-पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, पुणे, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, पुणे , तहसीलदार-राजगुरुनगर (खेड), तालुका -खेड, जिल्हा – पुणे, मुख्याधिकारी - आळंदी नगरपरिषद, तालुका-खेड, जिल्हा-पुणे, ग्रामपंचायत कार्यालये - मरकळ, सोळु, धानोरे, गोळेगाव, , तालुका-खेड, जिल्हा - पुणे, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

सदस्य, समन्वयक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास ग्रामपंचायत कार्यालय- गोळेगाव-पिंपळगाव यांच्याकडून एक आक्षेप / सूचना व ग्रामपंचायत ठराव दिनांक ११-०२-२०२० रोजी प्राप्त झालेला आहे. सदस्य, समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. श्री शिंदे यांनी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

डॉ. जयश्री कटारे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या पर्यावरण सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. त्यात त्यांना पर्यावरण व्यवस्थापन योजना, आपत्ती व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी यात हाती घेण्याचे सामाजिक उपक्रम याबाबत सर्व माहिती सांगितली.

सादरीकरणानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना त्यांच्या हरकती, आक्षेप, सूचना वा टिकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रतिनिधींकडून/प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

सदस्य, समन्वयक यांनी सांगितले की मप्रनि मंडळाच्या पुणे कार्यालयास दिनांक ११-०२-२०२० रोजी ग्रामपंचायत, गोळेगाव यांचा आक्षेप प्राप्त झालेला आहे.

१) **<u>श्री विलास शिंदे, राहणार-वडगाव शिंदे, तालुका-हवेली, जिल्हा-पुणेः-</u>**

प्रकल्प प्रवर्तक झाडे किती व कुठे लावणार आहेत?

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांप्रमाणे प्रकल्पाच्या एकूण क्षेत्राच्या ३३% हरितपट्टा संवर्धन करणे बंधनकारक आहे. मात्र प्रकल्प प्रवर्तक एकूण क्षेत्राच्या ३६% भाग हरितपट्टा विकसित करणार आहेत. त्याचप्रमाणे निर्देशांप्रमाणे ७७७ झाडे लावणे बंधनकारक असताना प्रकल्प प्रवर्तक ८३९ झाडे लावणार आहे.

श्री विलास शिंदे यांना येथे मत मांडले की झाडे लावल्यावर ती जगवली पाहिजे. त्याचा अहवाल स्थानिकांना उपलब्ध करण्यात यावा. पर्यावरण सल्लागार यांनी अहवाल देण्याचे आश्वासन दिले.

२) **<u>श्री रामदास लोखंडे, नाणेकर वस्ती, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-</u>**

प्रकल्प प्रवर्तक नाणेकर वस्तीत किती झाडे व कोणत्या प्रकारची झाडे लावणार आहेत? झाडे लावताना पाण्याचे नियोजन कसे करणार आहेत याबाबत स्पष्टीकरण करण्यात यावे.

पर्यावरण सल्लागार ह्यांनी उत्तर दिले की कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधीतून सामाजिक उपक्रम म्हणून जवळील शाळेत ५० (पन्नास) झाडे लावणार आहे.

श्री रामदास लोखंडे यांनी पुढे प्रश्न विचारला की खिंडीतून कंपनीपर्यंत रस्ता आहे. निम्मा रस्त्याचे डांबरीकरण झालेले आहे. मात्र उरलेला रस्ता संपूर्ण मातीचा आहे. त्यात ब-याच प्रमाणात लोखंडाचे तुकडे असतात. त्यामुळे शाळेच्या गाड्या, मुलांच्या दुचाकी वाहने व स्थानिकांच्या गाड्या पंक्चर होतात व लोकांना त्रास होतो. त्यामुळे हा प्रश्न कसा सोडविणार आहात?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आपल्या सूचनांचा निश्चितच विचार करण्यात येईल. ६-७ दिवसात प्रकल्पातून जाणा-या गाड्यांना ताडपत्री लावण्यात येईल. मॅग्नेट लावण्यात आलेले आहे. त्याची काळजी घेण्यात येईल.

**३) श्री माऊली लोखंडे, राहणार- नाणेकर वस्ती, तालुका- खेड, जिल्हा-पुणेः-**

प्रकल्प कार्यान्वित/रस्ता मोठ्ठा करण्यामुळे झाल्यावर प्रकल्पातून हवा प्रदूषण किती होईल व हवा प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना असणार आहेत?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की संभाव्य हवा प्रदूषण किती होईल याचा अभ्यास तीन महिने केलेला आहे. ते नियंत्रण करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभाग यांनी निर्देश केल्यानुसार व त्यांनी प्रमाणित केल्यानुसार धुर व धुळीचा अटकाव करणारी अद्ययावत तंत्रज्ञान प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येणार आहे.

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की सदरहू सयंत्रणा कार्यान्वित करणार का? कारण गावात हवा प्रदूषणाचा मोठा प्रश्न आहे. शेजारील वस्तीतील जनावरे मरत आहेत. म्हणून शेजारी गावातील लोकांनी जनावरे वापरणे सोडून दिलेले आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की हवा प्रदूषण न होण्याची संपूर्ण काळजी घेण्यात येईल. मप्रनि मंडळास वेळोवेळी अहवाल द्यावा लागतो. आधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल.

याठिकाणी सदस्य, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना निर्देश केले की हवा प्रदूषण नियंत्रणाबाबत जे उत्तर दिले, त्यात विस्तृत माहिती देण्यात यावी. आपण दिलेल्या उत्तराने समाधान होत नाही. हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कोणती बसविण्यात येणार आहे, हवा कशी जाईल व धुळ कशी गोळा करण्यात येईल याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की कार्यरत प्रकल्पात चिमणीबरोबर फ्युम एक्सट्रक्शन सिस्टिम आणि डस्ट कलेक्टर धूर व धुळ कमी करणारी सयंत्रणा बसविण्यात आलेली आहे. प्रकल्प विस्तारिकरणानंतरही चिमणीस फ्युम एक्सट्रॅकशन सिस्टिम, डस्ट कलेक्टर व बॅग फिल्टर बसविण्यात येईल. त्याचप्रमाणे चिमणीची उंची ही ३२ मीटर्स असेल. चिमणीची उंची ही नियमाप्रमाणे असेल.

४) <u>सचिन लोखंडे, राहणार-नाणेकर वस्ती, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-</u>

या प्रकल्पामुळे आवाजाची पातळी वाढेल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प विस्तारिकरण पूर्ण झाल्यावर आवाजाची पातळी वाढणार नाही. मात्र प्रकल्प बांधकाम टप्प्यात आवाजाची पातळी वाढू शकते. तो त्रास स्थानिकांना न होण्यासाठी बांधकाम हे फक्त दिवसा करण्यात येईल. परिसरातील लोकांना दिवसा आवाजाचा त्रास न होण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील.

५) <u>श्री रामदास लोखंडे, राहणार- नाणेकर वस्ती, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-</u>

प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेमुळे चिमणीतून उत्सर्जन केलेल्या धुरामुळे परिसरातील, आजूबाजूच्या भाजीपाल्यावर काही परिणाम होईल काय? कारण आजूबाजूच्या लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर चालतो. ब-याचवेळा स्थानिक लोक शेतातील भाजी न धुताच वापरतात. त्यामुळे त्या धुराचा स्थानिक शेतक-यांचा पीकांवर काय परिणाम होऊ शकतो याबाबत माहिती द्यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्देश केल्याप्रमाणे विशिष्ट उंचीची चिमणी बसविण्यात येईल. येथे ३२ मीटर उंचीची चिमणी बसविण्यात येणार आहे. त्या चिमणीतून उत्सर्जन करण्यात येणारा धुर हा वरच जातो. धूर फिल्टर करुनच बाहेर सोडण्यात येईल.

त्यांनी पुढे प्रश्न विचारला की प्रकल्पात कार्यरत असणा-या कामगारांवर त्याचा दुष्परिणाम होऊ नये म्हणून काय उपाययोजना करण्यात येईल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पातील कामगारांना संरक्षक बूट, हातमोजे, हेल्मेट, गॉगल, पॅनोरामा चष्मा व धुराचा त्रास होऊ नये म्हणून नाकाला लावण्यासाठी मास्क देण्यात येईल. त्याचप्रमाणे आगीजवळ/विशिष्ट विभागात काम करणा-या कामगारांना फायर फायटींग सुट्स देण्यात येईल.

६) <u>श्री माऊली चौधरी, राहणार-गोळेगाव, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-</u>

<u>प्रकल्प विस्तारिकरणात स्थानिकांना किती टक्के रोजगार देण्यात येणार आहे? स्थानिकांना काय प्राधान्य देण्यात येणार आहे?</u>

प्रकल्पात स्थानिक कामगार कार्यरत असून विस्तारिकरणानंतरही स्थानिकांनाच जेवढे शक्य आहे तेवढी रोजगाराची संधी देण्यात येईल.

श्री माऊली चौधरी यांनी पुढे विचारले की प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेमुळे निर्माण होणा-या सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

**९) श्री रोहन काकडे, वडगाव शिंदे, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-**

आमचे गाव प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात येते. प्रकल्प प्रवर्तकांनी १० कि.मी. परिघातील परिसरातील प्रदूषण न होण्याची जबाबदारी कारखान्याने घेतली पाहिजे. ती घेतली तर प्रदूषण होणार नाही.. त्याचप्रमाणे किती स्थानिकांना रोजगार देण्यात येईल याची टक्केवारी विचारली असता ती माहिती देण्यात आलेली नाही. ती देण्यात यावी. त्याचप्रमाणे दहा गावातील लोकांना विकासाचा फायदा झाला पाहिजे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की उपस्थित केलेल्या सूचनांचे पालन करण्यात येईल.

**१०)श्री रामदास लोखंडे, राहणार- नाणेकरवस्ती, तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-**

आज जशी ही बैठक बोलावली, तशीच बैठक कारखान्याचे काम पूर्ण झाल्यावर बोलवावी व स्थानिकांना प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेल्या वचनांची किती पूर्तता केली हे तपासूनच कंपनीला प्रकल्प सुरु करण्याची परवानगी द्यावी.

येथे सदस्य, समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली की मप्रनि मंडळ प्रकल्प प्रवर्तकांनी अभिवचन दिल्याप्रमाणे प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उभारली का याची खातरजमा, मोजमाप करुनच संमतीपत्र प्रदान करते. त्याचप्रमाणे येथे प्रकल्प प्रवर्तकांनी पूर्तता केली नसल्यास प्रदान केलेले संमतीपत्र नाकारण्यात येते. संमतीपत्र प्रदान करणे वा दिलेली परवानगी नाकारणे याबाबतची सर्व कार्यवाही ही पारदर्शक असते व त्याची सर्व माहिती मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करण्यात येते.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोठलाच प्रतिसाद नव्हता. सदस्य, समन्वयक यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

डॉ. जयश्री कटारे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील चर्चेचा ऊहापोह करताना सांगितले की मप्रनि मंडळास ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेले लेखी आक्षेप, सूचना शासनास पाठविण्यात येतील व बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती व त्यास पर्यावरण सल्लागार यांनी दिलेली उत्तरे यांची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेण्यात

येईल व सदरहू इतिवृत्त, प्राप्त झालेले ग्रामपंचायतींचे लेखी आक्षेप अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनास सादर करण्यात येतील.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी बाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे सीएसआर निधी अंतर्गत कुठले उपक्रम राबवविणार आहात व नियमांप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाची पूर्वपरवानगी घेऊन सीईआर निधि अंतर्गत कुठले उपक्रम प्रस्तावित आहेत याची माहिती देण्याची सुचना केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांना सीएसआर बंधनकारकच आहे. त्याचप्रमाणे जिल्हाधिका-यांच्या पूर्वपरवानगी सीईआर अंतर्गत विविध पर्यावरण कार्यक्रम हाती घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यात यावा अशी सूचना त्यांना दिली. त्यांनी सांगितले की बैठकीत स्थानिकांनी सूचना केली की प्रकल्पात स्थानिक व परिसरातील युवक युवतींना रोजगार देण्यात यावा. त्यासाठी लागणारे कौशल्यविकास प्रशिक्षण (Skilled Development Programme) स्थानिक युवक युवतींना देण्यासाठी योग्यप्रकारे कार्यक्रम आखण्यात यावा. सहा महिने वा विशिष्ट कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा.

एका स्थानिकांनी मरकळ गावाचे आक्षेप वाचून दाखविण्याची विनंती समितीस केली. त्यावेळी सदस्य, समन्वयक यांनी सांगितले की गोळेगाव, पिंपळगाव यांचे आक्षेप प्राप्त झालेले आहेत. मात्र मरकळ ग्रामपंचायतीचे कोणतेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी मरकळ ग्रामपंचायतीस मप्रनि मंडळाने पाठवविलेले पत्र वाचून दाखविले.

बैठकीचा समारोप करताना सदस्य, समन्वयक यांनी मत मांडले की माननिय अध्यक्षा यांनी सूचना केल्याप्रमाणे स्थानिकांच्या गरजा लक्षात घेऊनच सीएसआर निधी खर्च करण्यात यावा. हरितपट्टा विकसित करताना मोठी झाडे आणून लावण्यात यावी. त्यामुळे ती लवकर वाढून हरितपट्टा विकसित होईल. त्याचप्रमाणे झाडांची संख्या वाढवून जास्तप्रमाणात झाडे लावण्यात यावीत.

सदस्य व समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप वा टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून प्रतिसाद नव्हता.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, टिकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा अंतर्भाव हा बैठकीच्या इतिवृतान्तात करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिकांचे, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानले व बैठकीचे कामकाज पूर्ण झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

**(नितीन शिंदे)**
सदस्य, समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२,
मप्रनि मंडळ, पुणे

**(डॉ. जयश्री कटारे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे
जिल्हा-पुणे